**नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०१० मधील नि.१३० वरील आदेश**
**(पारित दिनांक ०६/०४/२०१७)**
**(मगबुल इनामदार वि.मुस्तफा इनामदार)**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. काही प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. सदरचा दावा हा चौकशीकरीता नेमलेला आहे. प्रतिवादी नं.१२ अन्नपुर्णाबाई कृष्णराव रास्ते हया मयत झालेबाबतची पुरशीस प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दाखल केलेली आहे.

३. वादी यांनी दावा कलम ६ मध्ये काही आवश्यक प्रतिवादी सामील केलेबाबत नमूद केलेले आहे. त्यांचेविरुध्द वादीस कोणतीही दाद मागणेची नाही. प्रतिवादी नं.१२ यांसही आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले आहे. त्यांचे विरुध्द कोणतीही दाद मागणेची नाही. कारण वाद मिळकतीत नमूद आणेवारीत प्रतिवादी नं.१२ यांच्या नावाची नोंद आहे. वादी यांना त्यांचेविरुध्द कोणत्याही स्वरुपाची दाद मागणेची नाही. त्यामुळे त्याबाबत दुरुस्ती करण्यास तसेच प्रतिवादी नं.१२ यांचे नांव कमी करण्यास परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला आहे. वरील दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताच बदल होणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्ज व त्यामधील मजकूर योग्य व कायदेशीर नाही असे म्हटले आहे. जी दुरुस्ती मागितली आहे त्या दुरुस्तीचा विचार करता दाव्यात आवश्यक असणारे पक्षकार कमी होणार असल्यामुळे योग्य तो हुकूम व्हावा असे म्हणणे दाखल केले आहे.

५. अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच वादीं, प्रतिवादींच्या

वकिलांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरुन असे दिसून येते की, वादींनी अर्जात मागितलेली दुरुस्ती ही मयत प्रतिवादीचे नांव कमी करण्याबाबतचे आहे. सदर प्रतिवादी विरुध्द वादीला काहीही दाद मागावयाची नाही. दाव्याचा न्यायनिर्णय देण्यास सदर प्रतिवादीचे नांव कमी केल्यामुळे काहीही बाधा येणार नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात काहीही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींचे काहीही नुकसान होत नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित आहे. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

**१.** अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी नि.१३० वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी.

**३.** वादी यांनी अर्जाचा खर्च र.रु.२००/-(र.रु.दोनशे फक्त) प्रतिवादी यांना दयावा.

वाई
दिनांक ०६/०४/२०१७

(रोहिणी का.थोरात)
दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, वाई.